Impact Factor: 6.017
ISSN: 2278-9529

# GALAXY

International Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed e-Journal

Vol.15, Issue- 1 January 2026

15 Years of Open Access

Editor-In-Chief: Dr. Vishwanath Bite
Managing Editor: Dr. Madhuri Bite

www.galaxyimrj.com

# आदिवासी समाजातील नेतृत्व शिवाजीराव मोघे यांचा जीवन परिचय

सुवर्णा तुकाराम खुडे
संशोधक,
राज्यशास्त्र विभाग,
पीपल्स कॉलेज नांदेड
डॉ. खान आय.जी.
मार्गदर्शक,
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्री रेणुका देवी विद्यालय माहूर.

प्रस्तावना-

महाराष्ट्रातील ग्रामीण समाज रचनेत परिवर्तन घडवण्यासाठी राजकीय नेतृत्वाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण राहिली आहे. बदलत्या सामाजिक राजकीय परिस्थितीत लोकाभिमुख मूल्यनिष्ठ आणि विकासभिमुख नेतृत्वाने जलसामान्याच्या जीवनमानावर लक्षणीय परिणाम घडवून आणला आहे. या नेतृत्वाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तिमत्वा पैकी निसर्ग पूजक मातृसत्ताक आदिवासी समाजातील उच्च विद्याभूषित चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्व असलेले शिवाजीराव शिवरामजी मोघे हे आहेत. हे एक प्रभावी तत्त्वनिष्ठ आणि परिवर्तनवादी राजकीय नेते म्हणून ओळखले जातात. शिवाजीराव मोघे यांचे जीवन म्हणजे महाराष्ट्रातील दुर्बल गोरगरीब घटकाच्या प्रगतीसाठी आयुष्य झिजणाऱ्या एका झुंजार कार्यकर्त्याचा सामाजिक व राजकीय संघर्षमय इतिहास आहे. शिवाजीराव यांच्या राजकीय प्रवासाचे वैशिष्ट्ये म्हणजे सत्ता हे साधन मानत, ती समाज परिवर्तनासाठी साधन म्हणून वापरण्याची त्यांचे स्पष्ट भूमिका ग्रामीण भागातील सामाजिक प्रश्न, शेतकरी आणि वंचित घटकाचे हक्क, आदिवासी समाजाचे समाज परिवर्तन तसेच लोक सहभागावर आधारित विकास मॉडेल लोकांशी सतत संवाद साधने, स्थानिक समस्याच्या मुळाशी जाऊन विश्लेषण करणे आणि त्यावर व्यवहारी उपाय सुचविणे ही त्यांच्या नेतृत्वाची शैली मुख्य वैशिष्ट्ये मांडली

जातात. सामाजिक नेतृत्व हे केवळ सत्ता प्राप्ती पुरते मर्यादित नसून समाजात सकारात्मक बदल घडविण्याचे माध्यम आहे. ही विचारसरणी शिवाजीराव मोघे यांच्या कार्यात सातत्याने दिसून येते. त्यांच्या नेतृत्वाचा प्रभाव सामाजिक न्याय, शिक्षण, युवक सक्षमीकरण आणि ग्रामीण विकास या क्षेत्रात आजही जाणवतो. म्हणूनच त्यांच्या राजकीय कार्याचा शैक्षणिक दृष्टीने अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

इयत्ता नववी मध्ये शिकत असतानाच ते व्यसनमुक्तीच्या चळवळीत एक कार्यकर्ता म्हणून काम करू लागले हे वय खेळण्याबागळण्याचे पण त्यांनी विद्यार्थी दशेतच व्यसनमुक्तीच्या चळवळीत सहभाग नोंदवून वयाच्या पंधराव्या वर्षी समाजसेवेचा आरंभ केला. श्री शिवाजीराव मोघे यांनी 1971 ला समाजातील अंबादास बुचके, श्री मधुकर झळके, श्रीराम अंभोरे, वामनराव वंजारे, देवराव चापले, सुदर्शन, लक्ष्मण दांडेगावकर इत्यादी समाजातील तरुणांना सोबत घेऊन महाराष्ट्र आदिवासी सेवा संघाची स्थापना केली. श्री शिवाजीराव मोघे यांची अध्यक्ष म्हणून तर श्यामराव व्यवहारे यांची सचिव म्हणून निवड करण्यात आली. अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, सामूहिक विवाह मेळावे, शिक्षणाचा प्रसार, सामाजिक ऐक्य या महत्त्वपूर्ण सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी व समाज प्रबोधनाद्वारे जागृती घडवून आणण्याचा प्रमुख उद्देशाने महाराष्ट्र आदिवासी सेवा संघाची स्थापना शिवाजीराव मोघे यांनी केली. ग्रामीण आदिवासी भागात लागू असलेल्या आदिवासी समाजाच्या प्रगतीत अडचणी आणणारा कायदा म्हणजे क्षेत्र बंधन कायदा होता. हे कायदा रद्द होण्यासाठी शिवाजीरावांनी खूप परिश्रम घेतले शेवटी अनेक वेळा श्रीमती इंदिरा गांधी यांची शिष्टमंडळाद्वारे भेट घेण्यात आली. व सातत्याने पाठपुरावा केला त्यांच्या अथक परिश्रमामुळे अखेर 1976 रोजी क्षेत्र वंदन कायदा रद्द करण्यात आला. शिवाजीराव मोघे यांनी 1980 पासून राजकीय जीवनात प्रवेश केला. 1980 मध्ये केळापूर मतदारसंघातून पहिल्यांदा महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आले. त्यांनी अनेक मंत्र पदावर काम केले. महाराष्ट्रातून समाजकारण ते राजकारणाला सुरुवात केली. शिवाजीराव मोघे यांनी महाराष्ट्र राज्याचे साडेबारा वर्ष कॅबिनेट मंत्री म्हणून काम केले व गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून तसेच नागपूर

जिल्ह्याचे आठ वर्ष पालकमंत्री म्हणून सेवा केली. त्यांनी नेहमी काँग्रेस पक्ष सोबत एकनिष्ठ राहून काम केले त्यांनी राज्य काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष व पंधरा वर्षे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सदस्य म्हणून कार्य केले. आमदार, राज्यमंत्री, उपमंत्री, कॅबिनेट मंत्री असा नेत्रदीप प्रवास त्यांनी राजकारणात केला आहे अथांग कष्टाने आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी राजकारणात यश मिळवले आहे. शिवाजीराव मोघे यांनी आपल्या कार्यकाळात शिक्षण सामाजिक जागृती, संघटन या क्षेत्रात त अनेक उपक्रम राबविला त्यांच्या कामाचा प्रभाव केवळ स्थानिक पातळीवर पुरता मर्यादित न राहता व्यापक सामाजिक बदलांना प्रेरणा ठरला आहे. म्हणूनच त्यांच्या जीवनकार्याचा अभ्यास अभ्यास समजावून घेण्यासाठी आवश्यक ठरतो. राजकारण हे केवळ सत्तेचे साधन नसून समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे ही भूमिका शिवाजीराव मोघे यांच्या कार्यातून सातत्याने दिसून येते त्यांच्या राजकीय जीवनाचा अभ्यास केल्यास आदर्श नेतृत्वाची विविध पैलू स्पष्टपणे समोर येतात राजकीय म्हणून शिवाजीराव मोघे यांचे राजकीय हे अभ्यासक कार्यकर्ते आणि नेतृत्वाची प्रेरणादायी ठरते.

संशोधनाची उद्दिष्टे.

1) आदिवासी समाजातील नेतृत्वाची संकल्पना समजावून घेणे.

2) शिवाजीराव मोघे यांच्या जीवन प्रवासाचा अभ्यास करणे.

3) शिवाजीराव मोघे यांच्या शैक्षणिक व राजकीय उन्नतीसाठी केलेल्या कार्याचा विश्लेषण करणे.

4) शिवाजीराव मोघे यांच्या कार्याचा आदिवासी समाजावर झालेला प्रभाव तपासणे.

5) जमीन वन हक्क स्वावलंबन, सामाजिक न्याय याबाबतचे विचार आणि उपक्रम समजावून सांगणे.

**1)** जन्म व बालपण.

बहुसंख्य अंध व बंजारा वस्तीत असलेल्या निसर्गाच्या कुशी त वसलेल्या मरसूळ खेडेगावात शिवरामजी मोघे व शेवंताबाई मोघे या आदिवासी दांपत्याच्या पोटी 27 मार्च 1945 ला पुत्ररत्न जन्माला आले त्यांचे नाव म्हणजेच शिवाजीराव शिवराम जी मोघे होय. त्यांच्या

वडिलांचा व्यवसाय हा शेती होता आणि आई घरकाम करत असे त्यांचे आई- वडील शिकलेली नव्हते पण आपल्या मुलांनी खूप शिकावे असे त्यांना वाटत होते. स्वातंत्र्यपूर्व काळात खेड्यापाड्यात शाळा नव्हत्या बालपणापासूनच शिवाजीराव मोघे जिज्ञाशी,अभ्यासू आणि कार्यतत्पर स्वभावाची होते. शिवाजीरावाला तीन चार गावी प्राथमिक शिक्षण मरसूळ, वनवारला, जांब बाजार येथे झाले आहे. लहानपणापासूनच मातापित्यांनी शिवाजीरावावर चांगले संस्कार केले त्यांच्या जडणघडणीत व शिक्षणामध्ये महत्त्वपूर्ण त्यांच्या आई-वडिलांची भूमिका होती.

**2)** शिक्षण.

प्राथमिक व माध्यमिक शिक्षण.

शिवाजीराव मोघे यांनी पहिल्या वर्गाचे शिक्षण हे मरसूळ या गावी पूर्ण केले मरसूळ हे त्यांचे जन्मगाव आहे दुसऱ्या वर्गापासून शिवाजीरावांना शिक्षणासाठी खडतर प्रवास करावा लागला. दुसऱ्या वर्गात त्यांच्या गावाजवळ असणाऱ्या वनवारला येथील जनपद शाळेत त्यांच्या वडिलांनी दाखल केले वनवारला येथे येता जाताना पूस नदी ओलांडून चालत जावे लागे. तिसऱ्या वर्गाची व्यवस्था त्यांच्या वडिलांनी सात ते आठ विद्यार्थी मिळून जांब बाजार या ठिकाणी केली चौथ्या वर्गाची सोय न. पा. पुसद येथे करण्यात आली. पाचवी ते बारावी पर्यंत शिक्षण पुसद या एकाच ठिकाणी झाले मात्र शाळा त्यांनी अनेक बदलल्या होत्या.

उच्च माध्यमिक शिक्षण.

अकरावी व बारावीचे शिक्षण हे प्रसिद्ध लोकहित विद्यालय पुसद येथे पूर्ण केले. बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर घरी हातभार लावण्यासाठी नोकरी करावी असा विचार शिवाजीरावांच्या मनात आला. परंतु त्यांच्या वडिलांनी त्यांना अर्धवट शिक्षण घेऊन नोकरी करू नको आधी खूप शिक मोठा हो पुढील शिक्षणाचा खर्च मी करतो असे सांगितले त्यामुळे शिवाजीरावांनी आपले शिक्षण सुरूच ठेवले. सर्वसामान्य माणूस हा आपला मुलगा लवकर मिळवता/कमवता होऊन कुटुंबास

हादवार लावावा या विचाराचा असतो परंतु त्यांच्या वडिलांनी तसे न करता पुढील शिक्षण घेण्यास सांगितले होते.

उच्च शिक्षण.

उच्च शिक्षणासाठी शिवाजीरावांनी वाणिज्य शाखेची निवड केली आणि पदवी स्तरावर वाणिज्य विषयात अभ्यास केला. पदव्युत्तर शिक्षण म्हणून त्यांनी एम. ए. एम. कॉम (मास्टर ऑफ कॉमर्स) पदवी प्राप्त केली ज्यामुळे त्यांची आर्थिक, सामाजिक आणि प्रशासकीय विषयावरील दृष्टी अधिक व्यापक झाली. पुढे त्यांनी एल.एल.बी.(बॅचलर्स ऑफ लॉ) पूर्ण केले. व कायदेविषयक ज्ञान संपादन केले आणि त्यांचा उपयोग त्यांनी सामाजिक राजकीय कार्यात प्रभावीपणे केला. आर्थिक अध्ययन आणि कायदेशीर क्षण यांच्या समन्वयामुळे मोघे यांना समाजकारण आणि प्रशासनातही व्यापक समज मिळाली.

**3)** व्यवसाय.

शिवाजीरावांचा मूळचा व्यवसाय म्हणजे शेती हा होता. परंतु अतिशय खडतर प्रवास करून शिवाजीरावांनी नागपूर येथून आपला वकिलीचा अभ्यास पूर्ण करून वकिली करण्याचे ठरविले आदिवासींच्या समाजामध्ये वकिल होण्याचा मान शिवाजीरावांना मिळाला 1972 पासून त्यांनी दारवा व यवतमाळ येथून वकिलीचा व्यवसायास सुरुवात केली. त्याशिवाय ते एक दीर्घकालीन राजकीय नेते आहेत त्यांनी अनेक वेळा विधानसभेवर निवडणुकीत विजय मिळवला त्यांच्या व्यवसाय कृषी व्यवसाय बरोबरच त्यांनी सार्वजनिक प्रतिनिधित्वाचा मार्ग स्वीकारला.

**4)** विवाह.

शिवाजीरावांनी वकिलीचा व्यवसाय सुरू करताना त्यांचे आदिवासी समाजा मध्ये नाव खूप झळकू लागले वकिलीचा व्यवसाय सुरू असताना वाशिम जिल्ह्यातील मानोरा तालुक्यातील खावडा या खेडे गावचे प्रतिष्ठित नागरिक कार्यकर्ते व अकोला जिल्हा परिषदेचे माजी सदस्य श्री चिंतामणराव जळके यांची रेखाताई झळके या सुकन्याशी शिवाजीरावांचा विवाह 12 मार्च 1972

या रोजी संपन्न झाला समाजकारण ते राजकारणात पुढे येण्यासाठी चांगल्या घराण्याशी संबंध जुळून यावेत लागतात तसाच काही योगायोग शिवाजीरावांच्या बाबतीत घडून आला.

**5)** समाजसेवेस प्रारंभ.

शिवाजीराव मोघे महाराष्ट्रातील सामाजिक कार्यकर्ते आणि समाजसेवक म्हणून ओळखले जातात त्यांचे सामाजिक कार्य प्रामुख्याने ग्रामीण विकास, शिक्षण, आरोग्यसेवा इत्यादी केंद्रित होते. शिवाजीरावांनी विद्यार्थी दशेत व्यसनमुक्तीच्या चळवळीत सहभाग नोंदवून वयाच्या पंधराव्या वर्षी आरंभ केला. 1971 ला आदिवासी समाजातील काही तरुणांना सोबत घेऊन महाराष्ट्र आदिवासी सेवा संघाची स्थापना केली. अंबादास बुचके, श्री मधुकर झळके, शामराव व्यवहारे, श्रीराम अंभोरे, वामनराव वंजारे, देवराव चापले, सुदर्शन, लक्ष्मण दांडगावकर इत्यादी समाजातील तरुणांना सोबत घेऊन महाराष्ट्र आदिवासी सेवा संघाची स्थापना केली. अध्यक्ष म्हणून शिवाजीरावांची निवड केली तर सचिव या पदावर शामराव व्यवहारी यांची निवड करण्यात आली. अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, सामूहिक विवाह मिळावे, शिक्षणाचा प्रसार, सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी महाराष्ट्र आदिवासी सेवा संघाची स्थापना केली. शिवाजीरावांनी कोंबडे बकरे, बळी देणाऱ्या प्रथा वर विरोध केला. नवसाचा मुलासाठी विविध प्रकार करण्याचे व भूत भानामती करणाऱ्या विविध अघोरी अंधश्रद्धा वर चांगलाच विरोध दर्शवला तसेच अखंड तळमळीने व आपुलकीच्या हृदयाने त्यांनी स्वतःला समाजाप्रती समर्पित करून समाजसेवेस प्रारंभ केला.

**6)** राजकारणात प्रवेश.

शिवाजीराव मोघेंना राजकारणाचा वारसा हा त्यांच्या पित्याकडून मिळाला. शिवरामजी मोघे मरसूळ या गावचे सरपंच होते आणि पुसदच्या वसंतराव नाईक घराण्याची त्यांचे संबंध होते त्यामुळे शिवाजीराव मोघेंना राजकारणाचा वारसा मिळाला. शिवाजीराव मोघे हे काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते होते त्यांनी त्यांच्या राजकीय कीर्तीची सुरुवात युवा काँग्रेस पासून सुरुवात केली होती. त्यांचे नाईक घराण्याची सलोख्याचे संबंध होते एक सुशिक्षित, उबदार नेतृत्व म्हणून

काँग्रेस पक्ष त्यांच्याकडे पाहत होता. पक्षाला एक चांगला कार्यकर्ता मिळावा अशी काँग्रेस पक्षाला वाटले आणि 1978 ला दिग्रस सर्वसाधारण विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसचे तिकीट त्यांना मिळाले त्या निवडणुकीत मात्र त्यांना अपयश आले. पण त्यांचे नाव सर्व मतदार संघातील गावागावात पोहोचले नंतर पुन्हा त्यांना 1980 ला केळापूर राखीव मतदारसंघातून शिवाजीरावांना काँग्रेस पक्षांनी तिकीट दिले आणि त्या निवडणुकीत त्यांचा बहुमताने विजय झाला. त्या निवडणुकीत त्यांना सर्वाधिक मतांनी लोकांनी निवडून आणले. 1980 ला शंकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाची नवे मंत्रिमंडळ झाले त्या मंत्रिमंडळात शिवाजीरावांना कॅबिनेट मंत्री पदाचा दर्जा मिळाला आणि आदिवासी विभागाचे व अन्य पाच विभागाची मंत्रिमंडळ त्यांनी कार्यभार पार पाडला आदिवासी विकासाला दृष्टिकोन देण्याची त्यांना संधी मिळाली त्यांनी अनेक मंत्रिपद भूसविले. मानवी सेवा हीच ईश्वरसेवा आहे असे त्यांनी स्वीकारले आणि अनेक गोरगरीब घटकाच्या कल्याणासाठी अधिक जोमाने कार्याला सुरुवात केली.

शिवाजीराव मोघे हे 2009 ते 2014 या कालावधीत महाराष्ट्राचे सामाजिक न्याय मंत्री असताना त्यांनी अनेक विशेष उपक्रम राबवून त्यांनी मागासलेल्या दुर्लक्षित समाजातील घटकासाठी मोलाचे कार्य केले. इ कॉलरशिप रमाई ,घरकुल योजना, वस्तीगृहप्रवेशामध्ये सुधारणा, कर्ज वाटपात पारदर्शकता, शासकीय वस्तीग्रह मध्ये सुधारणा केल्या.

**7)** काँग्रेस पक्षातील भूमिका.

शिवाजीराव मोघे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षातील एक ज्येष्ठ राजकीय नेते आणि महाराष्ट्रातील प्रमुख काँग्रेस कार्यकर्ते आहेत. त्यांची पक्षातील भूमिका ही अतिशय महत्त्वाची मानली जाते. अखिल भारतीय आदिवासी काँग्रेस अध्यक्ष मोघे यांना अखिल भारतीय काँग्रेस अध्यक्ष म्हणून काँग्रेसच्या वतीने नियुक्त केले गेले आहे त्यामुळे आदिवासी समाजातील संबंधित धोरणे व पक्षाची भूमिका पुढे ढकलण्याची जबाबदारी त्यांच्याकडे आहे. ते महाराष्ट्र काँग्रेस मध्ये वरिष्ठ नेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या अनुभवाचा वापर काँग्रेस स्थानिक तसेच

राज्यस्तरीय राजकारणात केला जाते. हे काँग्रेसच्या पॉलिटिकल अफेयर्स कमिटी मध्ये ही समाविष्ट आहेत मोघे हे काँग्रेसच्या सानिया व राज्य राजकारणातील रणनीती आणि धोरणावर सक्रिय चर्चा करतात ते पक्षाच्या निर्णय प्रक्रियेत अनुभव आणि मतभेद आणून निर्णयांना दिशा देतात. 2025 च्या पॉलिटिकल अफेयर्स कमिटीमध्ये त्यांचा समावेश हा पक्षातील वरिष्ठता आणि रणनीती महत्त्वाचे निदर्श क आहे. काँग्रेस पक्षा त त्यांचा कार्याचा गवगवा आहे. काँग्रेस पक्षात राहून जनतेची भरपूर सेवा घडावी अशी त्यांची इच्छा आहे "पक्षाने मला मोठे केले, त्या पक्षाचा मी पाईक आहे". असे ते अनेक वेळा बोलवून दाखवितात अंध समाज आदिवासी समाज आणि विशाल बहुजन समाज या तिघांच्याही परिघांना छेद देऊन गरीब जनतेचे कल्याण करणारा हा कार्यकर्ता निश्चितच मोठा मानला पाहिजे.

शिवाजीराव केवळ प्रतिष्ठेच्या मागे लागले नाही लागले असते तर ते जनतेचे खरेखुरे नेते बनले नसते व जनतेचा विश्वास संपादन करू शकले नसते विरोधक सुद्धा त्यांना मान देतात स्वतःच्या प्रतिष्ठेपेक्षा लोकांची प्रामाणिक सेवा करण्याचे वृत्त त्यांनी अखंडपणे सांभाळले.

**8)** आदिवासी समाजाचे नेतृत्व.

शिवाजीराव मोघे हे आदिवासी समाजाच्या नेतृत्वात योगदान देणारे व्यक्तिमत्व आहे त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य आदिवासी समाजाच्या हक्कासाठी, स्वाभिमानासाठी आणि सामाजिक न्यायासाठी समर्पित केले. शिक्षण हेच समाजाच्या प्रगतीचे मुख्य साधन आहे या विचाराने त्यांनी आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. सामाजिक अन्याय, शोषण आणि अज्ञानाविरुद्ध आवाज उठून त्यांनी समाजा त जागृती निर्माण केली आदिवासी संस्कृती परंपरा आणि ओळख जपण्यावर त्यांनी विशेष भर दिला. संघटन शक्ती मजबूत करून समाज एकत्र आणण्याचे कार्य त्यांनी केले. शासनाचा विविध योजनांचा लाभ आदिवासी समाजापर्यंत पोहोचावा यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या नेतृत्वामुळे आदिवासी समाजात आत्मविश्वास

वाढला आणि प्रगतीची नवी दिशा मिळाली शिवाजीराव शिवराम जी मोघे यांचे कार्य आजही आदिवासी समाजासाठी प्रेरणादायी ठरते.

**9)** क्षेत्र बंधन कायदा.

1974 ला त्यावेळेसच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी व राष्ट्रपती श्रीमान व्ही. व्ही. गिरी यांना भेटण्यासाठी अंध समाजाचे एक शिष्टमंडळ दिल्लीला गेलेले. पैनगंगा नदीच्या पलीकडे मराठवाड्यात राहणारा अंध समाज हा आदिवासी ठरला होता, तर पैनगंगा नदीच्या अलीकडे विदर्भात राहणारा अंध आदिवासी ठरत नव्हता हा या समाजावर मोठा अन्याय होता. त्यामुळे गरीब अंध हा समाज सवलतीपासून पूर्णपणे वंचित झालेला होता. हे या समाजाचे फार मोठे दुःख असल्याची व्यथा या शिष्टमंडळाने इंद्राजींना सांगितले. शिष्टमंडळाचे म्हणणे इंदिरा गांधी यांनी शांतपणे ऐकून घेतले. क्षेत्र बंधन काढून या समाजावरील अन्याय दूर करावा ही शिष्टमंडळाची मागणी इंदिरा गांधींनी मान्य केली. आणि 1976 मध्ये क्षेत्र बंधन उठवून इंदिरा गांधींनी आंध व इतर आदिवासी जमातींना न्याय मिळवून दिला. शिष्टमंडळ मा. वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली नेण्यात आलेले होते. त्या शिष्टमंडळात खा. देवराव पाटील., मा. भानावतजी, मा. बाबुराव मडावी अशी धुरंधर मंडळी होती. शिवाय शिवाजीराव आणि आंध समाजाची अनेक नेतेमंडळी त्या शिष्टमंडळात होती. हा मुद्दा शिवाजीरावांनी इंदिरा गांधी यांना चांगल्या प्रकारे पटविला. त्यामुळे विदर्भातील या समाजाचे लोक आदिवासी म्हणून पुढील काळात ठरले गेले. त्याची आठवण अनेक कार्यकर्ते आजही सांगतात.

**10)** आदिवासी जमिनीचा हक्क.

मोघे यांनी आदिवासीच्या जमिनीवरील हक्काचे समर्थन केले विशेषता वनजमिनी संदर्भातील परंपरागत अधिकारासाठी त्यांनी आवाज उठवला आणि आदिवासीच्या हितासाठी उच्च न्यायालयात मुद्दे ठेवण्याचे प्रयत्न केले. त्यामुळे वन जमिनीवर त्यांच्या हक्काचे संरक्षण करण्याचा लढा अधिक स्पष्ट व्याप्त झाला. आदिवासीच्या जमिनी अनुसूचित क्षेत्रात गैर

आदिवासींना विकता येणार नाही यासाठी कायदे करण्याचे ठरले. अनेक राज्यात सन 1965 नंतर क्षेत्राच्या बाहेरील आदिवासींची जमीन विकायची असल्यास जिल्हाधिकारी यांच्या परवानगीने विकता येत होती. याचा मोठा दुरुपयोग देशात झाला. कित्येक आदिवासी भूमी झाले म्हणूनच महाराष्ट्रात 1974 ला गैर आदिवासीला विकत घेता येणार नाही असा निर्णय माननीय वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळा ने घेतला. सन 1949 ला आदिवासी क्षेत्र बंधनाबाहेरील आदिवासींना हा कायदा लागू असता तर प्रत्येक राज्यात लाखो एकर जमीन आदिवासी जवळ राहिली असती ते लुबाडल्या गेले नसते. महाराष्ट्राचा कायदा सण 1974 ला झाला पण पूर्वलक्षी प्रभावाने दिनांक एक एप्रिल 1957 पासून लागू झाल्यामुळे लाखो एकर जमीन आदिवासी जवळ आज महाराष्ट्रात त आहे.

**11)** मंत्री म्हणून कार्यकाळ.

शिवाजीराव मोघे हे महाराष्ट्रातील अनुभवी आणि प्रख्यात काँग्रेसने ते आहेत ते दीर्घकाळ राज्याच्या राजकारणात सक्रिय भूमिका बजावतात. ते आर्णी - केळापूर मतदार संघाचे वारंवार आमदार राहिले आहेत विशेषता 1980, 1985, 1999 आणि 2009 या वर्षांमध्ये त्यांनी विधानसभा निवडणूक जिंकली 1995 मध्ये त्यांनी स्वतंत्र उमेदवार म्हणून विजय मिळवला होता.

परिवहन मंत्री व रोजगार मंत्री. शिवाजीराव मोघे यांना 1999 मध्ये महाराष्ट्र सरकारमध्ये परिवहन व रोजगार या महत्त्वाच्या विभागाचे मंत्री म्हणून नेमण्यात आले या काळात त्यांनी राज्यातील वाहतूक व्यवस्था सुधारणावर लक्ष केंद्रित केले. वाहतूक विभागाची निगडि त मूलभूत सेवा, खास करून ग्रामीण भागातील कनेक्टिव्हिटी आणि रोजगार निर्मिती यावर काम केले गेले. त्या काळात रोजगार संधी वाढविणे आणि युवा पिढीला रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे त्यांचा धोरणात्मक उद्दिष्टे पैकी एक होते.

सामाजिक न्याय व ओबीसी कल्याण मंत्री **2009** ते **2010.**

2009 ला मोघे हे सामाजिक न्याय आणि ओबीसी कल्याण विभागाचे मंत्री म्हणून महाराष्ट्र मंत्रिमंडळात काम करत होते या विभागाचे काम अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी व दुर्बल समाजातील कल्याणासाठी धोरणे राबविणे हे होते. त्यांच्या मंत्रिमंडळ कार्यकाळात त्यांनी समाजातील मागास आणि आदिवासी समुदायासाठी न्याय आणि सुयोग्यता वाढवण्यासाठी विविध उपाययोजना केल्या विशेषता ओबीसी आणि एससी/ एसटी समुदायाच्या आरक्षण सामाजिक सुविधा आणि कल्याणकारी योजनांना प्राधान्य दिले गेले. मुलींचा राजकीय दृष्टिकोन आदिवासी व कल्याणकारी समुदायासाठी खूप जवळचा होता. कारण ते स्वतः आदिवासी संबंधित आहेत आणि त्यांच्या सामाजिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी विकासाच्या मुद्द्यावर काम केले तसेच वन हक्क जमिनीचे ताबे आणि सामाजिक न्याय यासारख्या गंभीर विषयावर ते आवाज उठवत होते. तसेच त्यांच्या राजकीय कारकीर्दीत ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे कार्यकारी अध्यक्ष देखील राहिले आहेत आणि पक्षाच्या धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतला आहे.

परिवहन आणि रोजगाराच्या क्षेत्रात सुधारणा करणे ज्यामुळे ग्रामीण अर्बन मधील वाहतूक सुविधाचा विस्तार आणि रोजगार निर्मिती वाढली. सामाजिक न्याय आणि ओबीसी कल्याण विभागासाठी कठोर धोरणात्मक काम जे अनुसूचित समाजांना अधिक न्याय संघात संधी देण्यास योगदान देत होते. या विविध मंत्र्याच्या भूमिका द्वारे मोघे यांनी महाराष्ट्रातील सामाजिक न्याय समुदाय आधारित विकास आणि लोकहिता चे काम यांना महत्त्व दिले. ज्यामुळे त्यांनी त्या विभागामध्ये दीर्घकालीन प्रभाव निर्माण केला.

**12)** आदिवासी समाजावर झालेला प्रभाव.

शिवाजीराव मोघे हे आदिवासी समाजाच्या उत्थानासाठी कार्य करणारे सामाजिक कार्यकर्ते नेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कार्याचा प्रभाव मुख्यता सामाजिक जागृती, हक्काची

जाणीव आणि संघटन या पातळ्यावर दिसून येतो. जंगल हक्क, जमीन मालकी, रोजगार आणि मूलभूत सुविधा बाबत आदिवासींमध्ये हक्काची जाणीव निर्माण केली अन्यायकारक प्रथा व शोषणाविरोधात आवाज उठवण्यासाठी लोकांना प्रवृत्त केले शिक्षणाचे महत्त्व पटवून देत शाळांमध्ये नाव नोंदणी करत, साक्षरता आणि पुढील शिक्षणाला चालना दिली. सामाजिक कुप्रथा कमी करण्यासाठी प्रबोधनात्मक उपक्रम राबवले, संघटन आणि नेतृत्व विकास सहभाग वाढवला. आदिवासी समाजासाठी प्रेरणा स्रोत ठरले त्यांच्या प्रयत्नामुळे समाजा त जागृती एकता, शिक्षण आणि सामाजिक न्यायाची पायाभरणी झाली आणि ते आजही आदिवासी समाजासाठी आदर्श आहेत. सांस्कृतिक अस्मितेचे जनक आदिवासी परंपरा, लोककला सण-उत्सव यांचे संरक्षण सन्मान यासाठी प्रयत्न करत आहेत बाह्य संस्कृतीच्या दबावात अस्मिता हरवू नये यासाठी जागृती प्रशासनाशी संवाद शासकीय योजना व धोरणे प्रत्यक्ष लाभार्थ्यापर्यंत पोहोचावी यासाठी प्रशासनाशी समन्वय साधना. तक्रारी मांडणी व उपाययोजना सुचवणे यात सक्रिय भूमिका एकूणच शिवाजीराव मोघे यांच्या कार्यामुळे आदिवासी समाजात आत्मविश्वास वाढला संघटन मजबूत झाले आणि हक्कासाठी लढण्याची दिशा मिळाली हा त्यांचा महत्त्वाचा ठसा मानला जातो.

निष्कर्ष _

शिवाजीराव शिवराम जी मोघेही आदिवासी समाजातील नेतृत्व समाजसेवा आणि राजकीय कार्यासाठी एक महत्त्वाचे व्यक्तिमत्व आहे. त्यांनी आपल्या आयुष्यात आदिवासी समाजाच्या हक्कासाठी सामाजिक न्यायासाठी आणि राजकीय सहभागासाठी मोठे प्रयत्न केले त्यांच्या नेतृत्वामुळे आदिवासी समाजाच्या प्रश्नांना अधिक आवाज मिळाला आणि राज्य तथा राष्ट्रीय पातळीवर त्यांच्या कल्याणासाठी चर्चा वाढली. शिवाजीरावांनी लहानपणापासूनच चळवळीत सहभाग घेतला समाजसेवेसाठी अखंडपणे कार्यरत आहे शिवाजीराव मोघे यांनी परिवहन, स्वयं रोजगार, जलसंधारण आणि बंदरे विकास या खात्याचे कॅबिनेट मंत्री होते त्यांच्याकडे समाज कल्याण, आदिवासी विकास, वने, सामाजिक वनीकरण, दुग्ध व्यवसाय, पशुसंवर्धन ही महत्त्वाची

खाती त्यांनी सांभाळली. शिवाजीराव मोघे यांनी मिळालेल्या मंत्रिपदाचा उपयोग हा गोरगरीब जनतेच्या विकासासाठी केला तसेच श्रेष्ठींनी त्याच्यावर टाकलेली जबाबदारी व विश्वास सार्थ ठरविला आहे.

शिवाजीराव केवळ प्रतिष्ठेच्या मागे लागले नाहीत तर जनतेचे खरेखुरे नेते बनले. प्रतिष्ठेची ओढाताण कधीही झाली नाही म्हणूनच लोकांचे खरेखुरे नेते बनण्याचा बहुमान त्यांच्याकडे जातो. मोघे यांचे जीवन हे संघर्षमय, समर्पित आणि आदिवासीच्या विकासासाठी कार्य करण्याची प्रेरणा देणारे आहे त्यांच्या कार्यामुळे आदिवासी समाजाच्या स्थिती बदल घडवून आणण्याचे अनेक प्रयत्न राहिले आणि त्यांच्या कार्याचा वारसा पुढील पिढीपर्यंत प्रेरणादायी रित्या राहिला.

संदर्भ ग्रंथ.

1) आदिवासी क्षेत्र बंधन व मा. इंदिरा गांधी - शिवाजीराव मोघे.

2) समाजभूषण शिवाजीराव मोघे - उत्तम गेडाम.

3) पैनगंगा नदीच्या खोऱ्यातील अंध आदिवासी - डॉ. गोविंद गारे.

4) जलसमाधीत मरसूळ गावची चिरंतन गाथा - सुधाकर पवार.

5) महाराष्ट्राची राजकारण व शासन - प्राचार्य. डॉ. एस. एस. गाढाळ.

6) भारतीय उत्थानाचा हाकारा - ग. शा. पंडित.

7) महाराष्ट्र विधानमंडळ राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा, प्रधान सचिव - विकास पाटील.

8) The scheduled Tribes - K.S Shing.

9)https//www.lokmat.com.

10)The Indian Express